# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट २०२२

गुन्हे शाखा, नवी मुंबई — दिनांक १८.०२.२०२२

**''रबाळे येथुन अपहरण झालेल्या मुलीचा नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पोलीसांनी कोल्हापुर येथुन घेतला शोध''**

---

दिनांक १६/०२/२०२२ रोजी रबाले पोलीस ठाणे गुन्हा रजि. I ८०/२०२२ भादविक ३६३ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयातील पिडीत मुलगी ही राहते घरातुन मैत्रीणीला भेटण्यासाठी जाते असे सांगुन घरातुन बाहेर गेली होती. त्याचा फायदा घेवुन अज्ञात इसमाने तिला फुस लावुन पळवुन नेले असल्याबाबतचा गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कंक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई हे समांतर तपास करीत असतांना इंस्टाग्राम, व्हॉट्‌अॅपच्या तांत्रीक तपासामध्ये गुन्हयातील पिडीत मुलगी व आरोपी आकाश पाटील हे कोल्हापूर या ठिकाणी आहे असे समजल्याने तात्काळ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कंक्ष, गुन्हे शाखा कक्ष कार्यालयातुन वरिष्ठांचे परवानगी सह पोलीस टीम कोल्हापूरयेथे रवाना केली असता सदर पिडीत मुलगी व आरोपी हे पेठ पडगाव, कोल्हापूर येथे मिळुन आल्याने त्यांना सुखरूप ताब्यात घेवुन त्यांना आज दिनांक १८/०२/२०२२ रोजी रबाळे पोलीस ठाण्यात पुढील योग्य त्या कारवाईकामी ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा पोलीस आयुक्त सो, मा.अपर पोलीस आयुक्त सो गुन्हे, मा.पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे शाखा, नवी मुंबई व मा.सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/ पराग सोनवणे, मसपोनि/तृप्ती शेळके, पोउपनिरी/ शरद भरगुडे व पोहवा/५२२ शेटये, पोशि/ २६५४ ठाकुर यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★